मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे न्यायालयात दाखल पुनरिक्षण अर्जावरील आदेशानुसार कार्यवाही करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-३/३४०६९३९/६३७/२०२६
अहिल्यानगर दिनांक स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा :- १. या कार्यालयाचे दोषारोप क्र साप्रवि/आस्था-३/१५३५/२०१५ दिनांक १७/०८/२०१५
२. गट विकास अधिकारी प स पाथर्डी यांचे कडिल पत्र क्र वशि/आ-१/८६७/२०१५, दिनांक ३०/६/२०१५ दोषारोप बजविले बाबतची पोहच
३. या कार्यालयाचे आदेश क्र साप्रवि/आस्था-३/४४/२०१६, दिनांक ११/०१/२०१६
४. सहाय्यक आयुक्त, (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचे कडिल पत्र क्र विशा-४/खाचौ/सीआर/१३/२०१६, दिनांक २८/१२/२०१६ प्राप्त दिनांक ११/०१/२०१७
५. या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र साप्रवि/आस्था-३७२/२०१७ , दिनांक २०/१/२०१७
६. गट विकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी यांचे पत्र क्र वशि/आस्था-१/९९/२०१७ दिनांक ३१/०१/२०१७
७. गट विकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी यांचे पत्र क्र वशि/आस्था-१/१५५/२०१७ दिनांक १८०/२/२०१७
८. श्री पंडीत एस पी, कनि सहा, यांचा खुलासा दिनांक १८/०२/२०१७
९. या कार्यालयाचे पत्र क्र साप्रवि/आस्था-३/२७२/२०१७ दिनांक २३/०२/२०१७
१०. या कार्यालयाचे पत्र क्र साप्रवि/आस्था-३/४६५/२०१७ दिनांक ११/०४/२०१७
११.गट विकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी यांचे पत्र क्र.वशि/आस्था-१/३५२/२०१७ दिनांक २०/०४/२०१७
१२.गट विकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी यांचे पत्र क्र वशि/आस्था-१/४१४/२०१७ दिनांक १२/०५/२०१७
१३. या कार्यालयाकडील आदेश क्रं साप्रवि-१/अ-३/७२२/२०१७ दिनांक ३१/०५/२०१७
१४. मा. अप्पर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, यांचेकडील आदेश जा.क्र. ९६/२०१७ दिनांक ३१/०१/२०१८
१५. अवर सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.डिईएन-२०२५/प्र.क्र.५७/आस्था-१२ दिनांक २९/०४/२०२६ समवेत मा. राज्यमंत्री यांचेकडील अपिल आदेश दिनांक २२/०४/२०२६

श्री.संजय पेत्रस पंडीत, हे कनिष्ठ सहाय्यक या पदावर पंचायत समिती पाथर्डी येथे कार्यरत असताना, पंचायत समिती पाथर्डी येथे अनाधिकृत गैरहजर असलेने या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक १३ च्या आदेशान्वये श्री संजय पेत्रस पंडीत, यांना सेवेतुन बडतर्फ करण्याची शिक्षा करणेत आलेली होती.

श्री.संजय पेत्रस पंडीत, कनिष्ठ सहाय्यक, यांनी इकडील संदर्भ क्रमांक १३ च्या आदेशा विरुध्द मा. अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, यांचेकडेस अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी होवून संदर्भ क्रमांक १४ अन्वये श्री पंडीत यांचे सदरचे अपिल अंशत: मान्य करणेत येऊन या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक १३ चा आदेश रद्द करणेत येऊन संदर्भ क्रमांक १३ च्या आदेशातील सेवेतुन काढुन टाकणे या शिक्षेऐवजी सक्तीने सेवा निवृत्त करणे ही शिक्षा करणेत आली.

उक्त नमुद शिक्षेचा आदेश व मा. अपर आयुक्तांचे निकालाचे अनुषंगाने श्री.पंडीत यांनी मा. राज्यमंत्री ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांच्या न्यायालयात अपील दाखल केले. सदर अपीलावर सुनावणी होवून संदर्भ क्र. १५ चे पत्रान्वये मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांच्या न्यायालयाचे निकालपत्र दिनांक १०/०६/२०२६ या कार्यालयास दिनांक २३/०६/२०२६ रोजी प्राप्त झालेले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम २१ नुसार पारीत निकालपत्राचे अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश देणेत आहेत.

१. अपीलार्थी श्री संजय पेत्रस पंडीत, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर यांचे अपिल मान्य करण्यात येत आहे.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, यांचे दिनांक ३१/०५/२०१७ तसेच अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे दिनांक ३१/०१/२०१८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.
३. अपीलार्थी यांचा दिनांक १८/०७/२०१२ ते दिनांक ३०/११/२०१६ पर्यंतचा गैरहजेरीचा कालखंड हा अपीलार्थीच्या रजा खात्यावर उपलब्ध असलेल्या संपुर्ण वैद्यकिय रजा आणि अर्जित रजा सदर कालावधीसाठी मंजुर करण्यात यावी आणि उर्वरित कालखंड हा 'विशष बाब' म्हणुन 'असाधारण रजा' अंतर्गत नियमित करुन सेवा सातत्य प्रदान करण्यात यावे.
४. अपीलार्थी हे दिनांक ०१/१२/२०१६ रोजी प्रत्यक्षात रुजु झाले असल्याने, त्या दिनांकापासुन ते पुन्हा सेवेत रुजू होईपर्यंतचा संपूर्ण कालखंड हा 'कर्तव्यावरील कालावधी' म्हणुन नियमित करण्यात करण्यात यावा व सदर कालावधीचे अनुज्ञेय वेतन व भत्ते त्यांना अदा करण्यात यावेत.
५. अपीलार्थी श्री पंडीत यांना मुळ पदावर तात्काळ पुन:स्थापित (Reinstated) करुन सेवेत सामावुन घेण्यात यावे.

तरी वरील मुद्दा क्रमांक ५ नुसार श्री संजय पेत्रस पंडीत, सक्तीने सेवानिवृत्त कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांना कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) या पदावर ----प्रा. आ. केंद्र बेलापुर---- ता. श्रीरामपुर---- येथे पुन:स्थापित करणेत येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री संजय पेत्रस पंडीत, सक्तीने सेवानिवृत्त कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक 202607090401126.... असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 09-07-2026 13:28:04
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री संजय पेत्रस पंडीत, सक्तीने सेवानिवृत्त कनि सहा, पंचायत समिती पाथर्डी
द्वारा व प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी

२/- सदरचा आदेश श्री.पंडीत यांना बजावणेत येवून दिनांकित पोहोच आणि सदर आदेशाची नोंद मुळ सेवा पुस्तकात घेणेत येवून नोंद घेतलेल्या मुळ सेवा पुस्तकातील पृष्ठाची छायांकित सत्य प्रत या कार्यालयास उलटटपाली सादर करावी.

प्रत:- वैद्यकिय अधिकारी, प्रा. आ. केंद्र बेलापुर ता. श्रीरामपुर........
प्रत:- अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर
प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर